महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अमरावती

# Government Medical College, Amravati

District Woman Campus, Shrikrishna Peth, Amravati - 444601, M.S. (INDIA)

Telephone No. ०७२१-२९९३१७१ Website : www.gmcamravati.org

Email - gmcamravati@gmail.com GSTIN २७NSKD०८५५९F१DD

No.GMCA/PS/Quotation/44 Seater Bus/६६२ /2026 Date:-१३/02/2026

## महाविद्यालयीन संकेतस्थळावर खूले दरपत्रक प्रसिध्द करणे

## प्रथम व द्वितीय एम.बी.बी.एस. विद्यार्थ्यांसाठी खाजगी बस सुविधा पुरविण्याबाबत.

सन २०२५-२०२६ करीता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय **अमरावती** सन २०२५-२६ या वर्षात प्रथम व द्वितीय एम.बी.बी.एस विद्यार्थी प्रवेशित झालेले असुन सदर प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता तसेच पीएसएम विभागांतर्गत विविध ठिकाणी आयोजित कार्यक्रमास जाण्याकरीता खाजगी बस सेवा उपलब्ध करुन देणे क्रमप्राप्त आहे. करीता भाडेतत्वावर खाजगी बस सेवा उपलब्ध करुन घेण्याकरीता पूरवठादार/निर्माते (उत्पादक) यांचे कडून खूले दरपत्रक मागविण्यात येत आहे. इच्छूक पूरवठादार/निर्माते (उत्पादक) खूले दरपत्रक या कार्यालयास सादर करु शकता.

दरपत्रका संबंधीचा सिलबंद लिफाफा स्वहस्ते अथवा पोस्टाने **दिनांक २५/०२/२०२६ ला सायंकाळी ०६.०० पर्यंत** या कार्यालयात सादर करण्यात यावा.

दिनांक २६/०२/२०२५ रोजी दूपारी २.०० वाजता या कार्यालयातील मा. अधिष्ठाता. यांचे दालनामध्ये दरपत्रक उघडण्यात येतील. पूरवठादार स्वत: उपस्थित राहू शकतात अथवा आपला प्रतिनिधी पाठवू शकतात.

१. “खाजगी बस सुविधा भाडेतत्वावर विषयक बाबीचे दरपत्रके” असा स्पष्ट उल्लेख बंद लिफाफ्यावर करण्यात यावा.
२. दरपत्रक अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय **अमरावती** यांचे नावाने या कार्यालयामध्ये पोहचता करण्यात यावा.
३. उशिराने प्राप्त झालेले दरपत्रक कोणत्याही परिस्थिती मध्ये स्विकारल्या जाणार नाही.
४. नमुद केलेल्या दरामध्येच बस सेवा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय **अमरावती** येथे सुरु करावे लागेल.
५. पूरवठादाराकडे पॅन नंबर, जीएसटी नंबर सह लेटरहेड वर दर नमुद करणे आवश्यक आहे. (पॅन नंबर, जीएसटी नंबर, सोबत जोडणे अनिवार्य असेल.)
६. वाहन अधिनियम १९८८ च्या कलम ६६ नुसार योग्य ते सर्व परवाने आवश्यक राहतील. वाहनांसंबंधी सर्व कागदपत्रे, GST नोंदणी प्रमाणपत्र, PAN Card, RTO कार्यालयाचे वाहन नोंदणी प्रमाणपत्र तसेच वाहनाचा विमा, पी. यु.सी. बाबतचे सर्व दायीत्यार्थी विमा पॉलीसी (Full Insurance) कागदपत्र, व ड्रायव्हर लायसन्स /प्रवासी परवाना) अद्ययावत असणे आवश्यक आहे. सर्व अद्ययावत दस्ताऐवजांची एक छायांकित प्रत पूरवठादार/निर्माते (उत्पादक) यांचे सही व शिक्क्यानिशी अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथे जमा करावी.

७. पुरवठा करण्यात येणा-या बस करीता इंधन, टोल, पार्किंग तसेच देखभाल व दुरुस्ती खर्च पुरवठा धारकाने करावयाचा आहे. भाडे तत्वावर घेण्यात येणारे वाहन सुस्थितीत ठेवणे आवश्यक राहील. त्याबाबत पूरवठादाराला कुठलीही सबब देता येणार नाही.

८. बस परवाना अद्ययावत असावे व बस चालवताना कायम जवळ बाळगणे बंधनकारक राहील. बस चालकास नियमीत गणवेश (खाकी ड्रेस किंवा पांढरा ड्रेस) असणे आवश्यक आहे. बसचालक/बदली बदली बस चालकाची संपूर्ण माहिती कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. तसेच बस चालकाचे चारित्र्य पडताळणी करुन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

९. भाडयाने पुरवठा करण्यात येणा-या बसच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने संपूर्ण मापदंड पाळणे आवश्यक आहे (Fire Safety, Air Bags) इ. आवश्यक आहे.

१०. आपणांस नेमून दिलेले कामकाज मंजूर केलेल्या दराप्रमाणे व कार्यालयाने दिलेल्या सुचना व मार्गदर्शनानुसार करावयाचे आहे. अटी व शर्तीचा भंग केल्याचे निर्देशनास आल्यास व्यक्तीशः दंडात्मक कारवाईस पात्र असाल याची नोंद घ्यावी.

११. बस भाडेतत्वावर लावणेसाठी उक्त भाडयाने घेण्यात येणारे बस शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथील विद्यार्थ्यांच्या वापरासाठी आहे.

१२. बस पुरवठाधारकाने मागणीनुसार बस भाडेतत्वावर पुरवठा करावा लागेल. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांचे नियंत्रणाखाली त्यांचेकडून प्राप्त झालेल्या सुचनेनुसार ठरवून दिलेला बस पुरवठा प्रमाणिकपणे व निपक्षपातीपणे करणे बंधनकारक आहे.

१३. मनुष्यबळाअभावी अथवा दुसऱ्या कारणा अभावी बस भाडेतत्वावर पुरवठा करणेस व्यत्यय आल्यास तो अटी व शर्तीचा भंग मानला जावुन पुरवठाधारकावर उचित कारवाई केली जाईल.

१४. महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार संबधित दरास/ रकमेस वॅट व इतर शासकीय कर लागु होत असल्यास सदरचा कर वाहन पुरवठादाराने भरावयाचा आहे.

१५. दरपत्रक स्विकारणे अथवा कोणतेही कारण न देता नाकारणे हा अधिकार अधिष्ठाता यांनी स्वत: कडे राखून ठेवलेला आहे.

१६. पूरवठादारास आदेश प्राप्त होताच निर्धारीत वेळेत वस्तूचा पूरवठाकरणे बंधनकारक राहील. निर्धारीत वेळेत त्यांनी वस्तूचा पूरवठा न केल्यास त्यांना डिफॉल्टर म्हणून घोषित करण्यात येईल. त्यांचे सोबत या संस्थेकडून कुठलाही व्यवहार केल्या जाणार नाही.

१७. ठेकेदारास कोणत्याही प्रकारचे अग्रीम (Advance) देण्यात येणार नाही. काही कारणास्तव अनुदान उशिरा प्राप्त झाल्यामुळे देयकाची रक्कम अदा करण्यास विलंब झाल्यास तशी तयारी ठेकेदाराने ठेवणे आवश्यक राहील. काही प्रसंगी अनुदान उशिरा उपलब्ध झाल्यास ठेकेदारास इंधन वा तत्सम बाबीसाठी कोणतीही रक्कम आगाऊ (Advance) दिली जाणार नाही.

| अ.क्र. | सेवेचे नांव | दर करासहीत |
|---|---|---|
| १ | भाडेतत्वावर खाजगी बस सेवा उपलब्ध करण्याबाबत ४४ सिटर बस | |

[signature] 13-02-2026

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अमरावती